आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ एप्रिल २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपा आणि काँग्रेसचे परस्परांवर आरोप प्रत्यारोप
- कम्युनिस्ट पार्टीच्या जाहीरनाम्यात जुनी निवृत्ती वेतन योजना, खासगी क्षेत्रातल्या नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचं आश्वासन
- तान्ह्या मुलांची अवैध विक्री करणाऱ्या ७ जणांना सीबीआयकडून अटक

**आणि**

- छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज जयपूरमध्ये प्रचारसभेला संबोधित केलं. जयपूरमधल्या सभेत त्यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका केली. तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसात भ्रष्टाचार निर्मुलनासाठी मोठे निर्णय घेऊ असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही आज जयपूरमध्ये प्रचार सभा घेतली. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी काँग्रेस ही निवडणूक लढवत असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. गेल्या १० वर्षातल्या सरकारनं बेरोजगारी, महागाई, आर्थिक संकट आणि असमानता आणण्यात कुचराई केली नसल्याचा आरोप काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी या सभेत केला.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज सहा जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली. पक्षानं उत्तर गोवा मतदारसंघात रमाकांत खलप यांना तर दक्षिण गोव्यात कॅप्टन विरिएॅटो फर्नांडिस यांना उमेदवारी दिली आहे. याशिवाय मध्य प्रदेशात मोरेना इथून सत्यपाल सिंग सिकरवार आणि ग्वाल्हेर मधून प्रवीण पाठक काँग्रेसच्या वतीनं निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

<><><><><>

कम्युनिस्ट पार्टीनं आज लोकसभा निवडणुकांसाठी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. ही निवडणूक देशासाठी आणि देशाच्या भविष्यासाठी महत्त्वाची असल्याचं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डी. राजा यावेळी म्हणाले. सरकारी कर्मचाऱ्यांना पुन्हा जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणं, सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांना प्रोत्साहन देणं आणि खासगी नोकऱ्यांमध्येही आरक्षण देण्यावर भर देण्याचा मानस पक्षानं जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी निधी वाढवणं, लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणाची तत्काळ अंमलबजावणी करणं अशी आश्वासनंही पक्षानं दिली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दशकभरातल्या कार्यकाळात झालेल्या परिवर्तनावर आधारित 'मोदी ट्रान्सफॉर्मिंग भारत' हे नवीन संकेतस्थळ भाजप युवा मोर्चानं तयार केलं आहे. या संकेतस्थळाचं अनावरण आज झालं. यावेळी बोलताना, सरकारच्या विविध उपक्रमांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी तरुणांचा सहभाग आवश्यक असल्याचं दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी सांगितलं. आज झालेल्या अनावरण कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्र उभारणीसाठीची प्रधानमंत्री मोदी यांची बांधिलकी त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशातल्या राज्यसभेच्या एका जागेच्या निवडणुकीच्या निकालाच्या विरोधात काँग्रेसचे प्रवक्ते आणि वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. २७ फेब्रुवारीला झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत भाजपाचे हर्ष महाजन आणि काँग्रेसचे अभिषेक मनु सिंघवी यांना समान मतं मिळाली होती, त्यामुळे त्यानंतर सोडत पद्धतीने काढलेल्या चिठ्ठीनुसार सिंघवी यांचं नाव आलं असता त्यांना विजयी घोषित करण्याऐवजी पराभूत घोषित करण्यात आलं, असं सिंघवी यांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

भाजपचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्यासह राज्यसभेच्या इतर पाच नवनिर्वाचित सदस्यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना संसदेच्या सभागृहात राज्यसभा सदस्य म्हणून शपथ दिली. भाजपाचे अशोक चव्हाण आणि  चुन्नीलाल गरसिया, तृणमूल काँग्रेसचे सुस्मिता देव आणि मोहम्मद नदीमुल हक तसंच काँग्रेसचे अनिलकुमार यादव मंदाडी यांनी राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत १८ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यांना आज दिल्लीतल्या राऊज ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं. दिल्ली उत्पादनशुल्क धोरण घोटाळ्याप्रकरणी विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी आम आदमी

पक्षाचे खासदार संजय सिंह देखील न्यायालयात हजर होते. त्यांची नुकतीच जामिनावर सुटका झाली आहे.

**<><><><>**

तान्ह्या मुलांची अवैध विक्री करणारी टोळी केंद्रीय गुप्तचर संस्था, सीबीआयनं उघडकीस आणली आहे. दिल्ली आणि हरयाणात विविध ठिकाणी छापे टाकून सीबीआयने तीन अर्भकांची सुटका केली. दीड दिवस आणि १५ दिवसांचे दोन मुलगे तर एक महिन्याच्या बालिकेचा त्यात समावेश आहे. या प्रकरणी ७ जणांना अटक केली असून सीबीआयने त्यांच्याजवळून सुमारे साडेपाच लाख रुपये रोकड, बनावट कागदपत्रं, आणि ती बनवण्याचं साहित्य जप्त केलं आहे. विनापत्य जोडप्यांना दत्तक अपत्य मिळवून देण्याची लालूच फेसबुक किंवा व्हॉट्सअप समाजमाध्यमांमार्फत दाखवून ही टोळी प्रत्येकी चार ते सहा लाख रुपयांना अर्भक विक्री करत होती असं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><>**

तेलंगणाच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तेलंगणात मुलुगी जिल्ह्यातल्या आंतरराज्य सीमेजवळच्या पुजारी कांकेर जंगलात ही चकमक झाली. तेलंगणाच्या नक्षलविरोधी दलाच्या ग्रेहाऊंडच्या पथकानं जंगल परिसरात नक्षलवाद्यांना घेरले. ग्रेहाउंड पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून एक एके-४७, एक एलएमजी आणि एक-१२-बोअर बंदूक. जप्त केली आहे.

**<><><><>**

लष्कराच्या विविध सेवांमध्ये समन्वय आवश्यक असून लष्करातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी युद्धाच्या बदलत्या स्वरूपाशी जुळवून घेण्याची गरज आहे, असं मत संरक्षण दलप्रमुख जनरल अनिल चौहान यांनी व्यक्त केलं आहे. ते आज तामिळनाडू मध्ये वेलिंग्टन इथं डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ महाविद्यालयातल्या भारतीय सशस्त्र दलातल्या भावी अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. भारतीय सैन्यात परिवर्तनात्मक सुधारणांवर लक्ष केंद्रित केलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रॉयल ऑस्ट्रेलियन नेव्हीचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल मार्क हॅमंड यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्यीय शिष्टमंडळानं मुंबईतल्या पश्चिम नौदल कमांडच्या मुख्यालयाला काल भेट दिली. यावेळी नौदलाच्या पश्चिम कमांडची भूमिका आणि सागरी आव्हानांचा आढावाही त्यांनी घेतला. शिष्टमंडळानं मुंबईतल्या नेव्हल डॉकयार्ड इथल्या स्वदेशी बनावटीच्या विनाशिका आणि पाणबुडीलाही भेट दिली.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बेंगळुरूमधल्या पाणीटंचाईवर नाराजी व्यक्त केली. बेंगळुरू हे जागतिक शहर पिण्याच्या पाण्याच्या संकटानं ग्रासले असून हे चिंताजनक आहे, असं निर्मला सीतारामन यांनी आज बेंगळुरूमध्ये वार्ताहर परिषदेत बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांनी शहराच्या विविध भागात शोधमोहीम राबवली. आतापर्यंत ३ बांग्लादेशी नागरिक, हद्दपार असतानाही

हद्दीत वावरणारा १ गुन्हेगार, २ हवे असलेले आरोपी, तसंच अमली पदार्थ बाळगणाऱ्या एकावर कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर बंगळुरूसोबत सुरू आहे. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बंगळुरूच्या ९ षटकात बिनबाद ८० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ बेलापूर ते पेंधर दरम्यान धावणाऱ्या मेट्रोच्या वेळेमध्ये येत्या सोमवारपासून म्हणजेच ८ एप्रिलपासून वाढ करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. त्यानुसार, सोमवार पासून बेलापूर मेट्रो स्थानकावरुन सकाळी ६ वाजता पहिली मेट्रो पेंधरच्या दिशेने रवाना होईल. बेलापूर मेट्रो स्थानक इथून शेवटची मेट्रो रात्री ११ वाजता पेंधरच्या दिशेने रवाना होईल तर पेंधर मेट्रो स्थानकावरुनन शेवटची मेट्रो रात्री साडेदहा वाजता बेलापूरच्या दिशेने रवाना होईल.

**//<><><><><>//**